# येशू मनुष्य म्हणून जन्माला आला

## 1. नाताळ आणि येशूचे देहधारण यांचा सखोल अर्थ शोधा.

**प्रार्थना:** ''प्रिय येशू, तू मनुष्य व देव असा दोन्ही आहेस ह्या अद्‌भुत सत्याची प्रशंसा करण्यास मला सहाय्य कर तुझ्यामध्ये देव आणि मनुष्य ह्यांचा संगम झालेला आहे आणि तू आम्हांला पित्याकडून मिळालेली सर्वात श्रेष्ठ देणगी आहेस, हे इतरांना समजावून सांगण्यास माझे सहाय्य कर''

**पार्श्वभूमी:** तुम्हांला अद्याप येशूच्या जन्माचा ऐतिहासिक वृत्तांत ठाउक नसेल तर कृपा करुन लूक 1 व 2 हे अध्याय आणि मत्तय 1 व 2 हे अध्याय वाचा नाताळसाठीच्या मुलांच्या अभ्यासात लूक 1 व 2 अध्यायातील नाटिकेचा समावेश आहे।



**यशयाने भविष्य वर्तवले** ख्रिस्तयेण्याच्यापूर्वी शेकडो वर्षे अगोदर यशया 7:14 हया वचनात तारणाफ्रयाला काय म्हणतील ते पाहा. उत्तर: त्याला ''इम्मानुएल'' म्हणतील त्याचा अर्थ ''आम्हा बरोबर देव''

**येशूच्या ठायी दोन स्वभाव होते,** देवाचा दैवी स्वभाव आणि मनुष्याचा मानवी स्वभाव. तो मानवजात आणि एकमेव अत्यंत पवित्र व सर्वसमर्थ देव यांना जोडणारा पूल आहे.

- योहान 1:1-3 हया वचनांत त्याचे कोणते दोन स्वभाव पहायला मिळतात?
- योहना 1:1 हे वचन येशूची ओळख सार्वकालिक वचन शब्द अशी करुन देते. तो कोण झाला असे योहान 1:7 हे वचन सांगते?
- योहना 1:1-3 घ्या वचनांत येशू मनुष्य म्हणून जन्मण्या आधीपासून अस्तित्वात होता का तो पाहा.
- इब्री. 2:14 व 15 घ्या वचनांत त्याचे कोणते दोन स्वभाव पहायला मिळतात?

  येशूने आमचा मानवी स्वभाव धारण करून आमचा कोणापासून बचाव केला तेही इब्री 2:14 व 15 ह्या वचनांत शोधा. उत्तर: मनुष्य होऊन ख्रिस्ताने आमचा सैतानापासून बचाव केला.
- येशू मनुष्य झाल्यामुळे आम्हांला त्याने काय होण्याचे सामर्थ्य दिले ते गलती 4:3-7 हया वचनांत पाहा. उत्तर: देव मनुष्य म्हणुन जन्मला म्हणून त्याने आमच्या ऐवजी मरण सोसले आणि आम्हांला देवाची मुले तसेच त्याच्या पित्याचा आशीर्वाद म्हणून त्याच्या बरोबरीचे वारीसही केले.

## 2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून नाताळचे विशेष कार्यक्रम ठरवा.

- काही विश्वासणारे नाताळाच्या काळात मित्रांच्या घरापुढे येशूच्या जन्माविषयी गीते गातील.
- काहीजण मिठाई किंवा इतर भेटी अत्यंत गरीब शेजाऱ्यांकडे घेऊन जातील.
- येशूच्या जन्माचा उत्सव साजरा करण्यासाठी इतर विश्वासणारे, मित्रमंडळी व नातेवाईक यांच्या समवेत प्रीतीभोजन आयोजित करा.

## 3. नाताळ साजरा करण्याची योजना आखा स्थानिक रिवाजांना, अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्यास सांगा.

येशूच्या जन्मविषयीची भविष्ये तुम्ही भविष्यांचा उल्लेख कराल तेव्हा प्रत्येक भविष्य वाचण्यासाठी मदतनीस तयार ठेवा. येशूचा जन्म होणार हे भविष्य त्याचा जन्म होण्याच्या किती तरी अगोदरच जुन्या करारातील संदेष्टयांनी सांगितले होते हे सांग त्यांनी भविष्य वर्तवले होते की अभिवचनाने देऊ केलेला मानवजातीचा तारणारा हा असा असेल.

- तो स्त्रीची संतती असेल आणि तो सर्पाचे (सैतानाचे) डोके फोडील, उत्पत्ती 3:15
- अब्राहामाची संतती जी सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करील, उत्पत्ती 12 वचने 1-3 व 7
- तो यहूदाच्या वंशातील असेल, उत्पत्ती 49:10
- लोक ज्याचे ऐकतील असा तो मोशेसारखा संदेष्टा असेल, अनुवाद 18:15
- तो दावीद राजाच्या वंशातील असेल, त्याचे साम्राज्य सर्वकाळ स्थिर असेल, यशया 9:6 व 7
- त्याचा जन्म बेथलहेममध्ये होईल, मीखा 5:2
- कुमारीच्या पोटी जन्म आणि त्याला 'इम्मानुएल' म्हणतील, यशया 7:14

आम्ही येशूला 'इम्मानुएल' का म्हणतो आणि त्याला दोन स्वभाव का होते हे समजावून सांगा.

**ज्ञानी माणसे** बाळ येशूला भेटण्यास येतात, मत्तय 2

- तुम्ही किंवा मदतनीसाने मत्तय 2 मधील वृत्तांत वाचावा किंवा आठवून सांगावा.
- येशू हा देवाने पाठवलेला एक विशेष राजा होता हे ज्ञानी माणसांनी ओळखले याचे स्पष्टीकरण करा.
- विचारा ''येशू जिवंत राहू नये असे एका अत्यंत वाईट माणसाला का वाटले?''
- ''आजही हेरोद राजासारखे वाईट माणसे कशा प्रकारे देवाला नाकारतात आणि त्याच्या लोकांना दुखवायचा प्रयत्न करतात?''
- ''मेंढपाळांना येशू गव्हाणीत आढळला ज्ञानी माणसांना तो कोठे आढळला?'' उत्तर घरामध्ये.
- ज्ञानी माणसांची संख्या किती होती हे काही पवित्र शास्त्रात सांगितले नाही, पण त्यांनी किती देणग्या आणल्या ते माम सांगितले आहे, त्यांनी किती देणग्या आणल्या?

कराराचा कोश हस्तगत करण्याचा वृत्तांत सांगा (1 शमवेल अध्याय 4-6). प्रथम, कराराचा कोश म्हणजे काय हे **समजावून सांगा**

- येशूचा जन्म होण्यापूर्वी, देवाने येशूच्या तारणदायी कार्याचे महत्वपूर्ण पैलू पृथ्वीवरील प्रतिकांमधून दाखवले होते, कराराच्या कोशाचा संबध माणसां बरोबर देवाच्या समझतेशी आहे. येशूचा जन्म झाला तेव्हा देव आमच्या बरोबर देहधारण करून राहण्यास आला, त्याने प्रतिकाची जागा घेतली.
- कोश म्हणजे मोठी लाकडी पेटी होती त्यात दगडी पाटया होत्या त्यावर देवाने लिहिलेल्या दहा आज्ञा होत्या. हाच त्याने इस्राएलाशी केलेल्या जुन्या करारातील त्याच्या कराराचा पाया होता. येशू, एखादया पवित्र कोशा प्रमाणे देवाचे नियमशास्त्र आपल्या अंतः करणात बाळगतो. तो नेहमीच देव पित्याचे आज्ञापालन करतो.
- कोश लाकडापासून तयार केला होता त्याच्यावर सोन्याचा पत्रा होता. यहेज्केलाने देवाचे गौरव पाहिले, ते मंदिराच्या उंबरठ्यावर आले होते यहज्केल 10:4, अशाच प्रकारे देवाचे गौरव येशूपासून निघालेले योहानाने व प्रेषितांनी पाहिले (योहान 1:14)
- दोन सोन्याचे करुब (धिप्पाड देवदूत) कोशाच्या झाकणावर दोन्ही बाजूला होते, त्यांचे पंख पसरलेले होते आणि त्याने तो कोश झाकून गेला होता शास्त्रलेखांमध्ये सर्वसमर्थ देवाच्या गौरवी समक्षतेचे वर्णन करताना अनेकदा अशा करूबांचे शब्दचित्र पहायला मिळते.



1 शमुवेल 1-4 घ्यामधील वृत्तांताचे फक्त मुख्य **मुद्दे सांगा.**

- इस्राएलच्या सैन्याची पलिष्टयां बरोबरच्या लढाईत पीछेहाट होत होती. देव आपल्या बाजूने लढेल घ्या आशेने त्यांनी पवित्र कोश युध्दभूमीवर आणण्याचा निर्णय घेतला.

- पवित्र कोश निवासमंडपात उच्च पवित्र स्यानी नेण्याची देवाने आज्ञा दिली. केवळ मुख्य याजकच वर्षातून एकदा होमार्पणाचे रक्त घेउन त्याकडे जात असे.
- इस्राएलच्या देवाने युध्दभूमीत प्रवेश केला आहे अशा समजूतीने पलिष्टी लोक धाबरून गेले. तथापि, त्यांनी नेटाने लढाई करून कोश हस्तगत केला.
- हे वर्तमान मुख्य याजक एलीने ऐकले आणि त्याला धक्का बसला. या क्क्यानेच तो मागे पडून गतप्राण झाला.
- पलिष्टी लोकांनी हस्तगत केलेला  पवित्र कोश त्यांच्या मंदिरातील मुर्तीजवळ मत्स्य देव दागोनाजवळ नेउन ठेवला.
- तिसऱ्या दिवशी, दागोन जमिनीवर खाली पडला आणि त्याच्या माशाच्या डोक्याचे तुकडे झाले पुढे कालांतराने येशूनेही तो तिसऱ्या दिवशी मेलेल्यांतून पुन्हा उठला ळतेव्हा त्याने जुन्या सर्पाचे डोके असेच चेचले
- दागोन आम्हांला एका मोठ्या माशाची आठवण करून देतो. ह्या माशाने योनाला गिळले होते आणि तिसऱ्या दिवशी त्याला जिवंत असे भूमीवर ओकून टाकले होते.
- पलिष्टी लोकांनी कोश नेला तेव्हा त्यांच्या अंगावर ग्रंथी उठल्या ह्या ग्रंथी वेदनादायी व प्राणघातक होत्या म्हणून त्यांनी एका गाडीला दोन गाई जुंपल्या त्यामध्ये कोश ठेवला आणि बिन गाडीवानाची ही गाडी देव परत इस्राएल कडे घेउन जातो का ते पाहू लागले.
- शेतात काम करणाऱ्यांनी चकाकणारे सोन्याचे पंख असणारा पवित्र कोश इस्राएलकडे परत जात असल्याचे पाहिले हे पाहून त्यांना आनंद झाला. येशू मरणातून परत आल्याचे पाहून शिष्यांनाही असाच आनंद झाला होता

**पाठ करा योहान 1:14**

प्रार्थना व कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी दोन किंवा तीन जणांचे **गट तयार करा.** इम्मानुएल 'आम्हाबरोबर देव' असलेला पुनरुत्थित ख्रिस्त विश्वासाने पाहण्यास आणि त्याच्या बरोबरचे आमचे नाते वाढावे यासाठी देवाकडे सहाय्य मागा. एकमेकांसाठी प्रार्थना करा.

**प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी योहान अध्याय 1 वचने 1-3 व 7 ही वाचा.**

- स्पष्ट करुन सांगा की येशू हा देवाचे जिवंत वचन आहे. त्याने देहधारण केला, तो अदृश्य देवाची दृश्य प्रतिमा झाला, (कलस्सै. 1:15-17; योहान 1:14)
- या अदभुत देहधारणाचे/प्रतिबिंब प्रभुभोजनामध्ये पडते यावरुन आम्ही भाकरीचे सेवन करतो तेव्हा आम्हांला येशू मानवी देहामध्ये जन्मला याची आठवण होते, सर्व मनुष्यांची पातके झाकण्यासाठी येशूने मानवी रक्त सांडले याबद्दल अधिक माहिती करुन घेण्यासाठी वाचा 1 तीमथ्य 2:3 व 7 आणि 1 योहान 2:2.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net